# स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव !

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटनने आपली भारतावरील सत्ता सोडून ४९ वर्षे पुर्ण झाली व पन्नासावा स्वातंत्र्यदिन साजरा होत आहे. वाढदिवस हा साजरा करण्यासारखा दिवस असतो व तो साजरा करताना गेले आयुष्य चांगले गेले की नाही याचा विचार करण्यात येत नाही. या दृष्टिने स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा व्हावा यात आक्षेपार्ह काही नाही. पण पुढे प्रगति करण्याची इच्छा असेल तर गत वर्षाचा आढवा घेऊन त्यातील उपलब्धी व अपयश यांचा हिशेब व उपलब्धीमध्ये कोणत्या आपल्या प्रयत्नांवर अवलंबून होत्या व अपयशापैकी कोणत्या बाबतीत आपण जबाबदार होतो यांची चिकित्सा करणे आवश्यक आहे. अशी चिकित्सा वस्तुनिष्ठ दृष्टिने केली पाहिजे. एका परिसंवादात अशी चिकित्सा मी केली तेव्हा देशाची अवहेलना करण्याचा आरोप माझ्यावर करण्यात आला. देशाबद्दलची सत्य स्थिति कथन करणे म्हणजे देशाची अवहेलना अशी व्याख्या केली तर अशी अवहेलना करणे हे प्रत्येक देशाभिमानी माणसाचे कर्तव्य आहे असे म्हणावे लागेल.

गेल्या पन्नास वर्षातली सगळ्यात मोठी उपलब्धी ही आहे की भारतात लोकशाही टिकून आहे. म्यानमारमध्ये ती एक वर्षही टिकली नाही. आज देखील तेथे सैनिक शासन सुरू आहे व लोकनिर्वाचित व्यक्तींच्या कपाळी तुरुंगवास लिहिला आहे. पाकिस्तानात देखील दोनदा सैनिक प्रासादक्रांति झाली व आजही तेथे सारी सत्ता लष्कराच्याच हाती आहे. पण प्रौढ व स्वतंत्र मतदानावर सरकार निवडून येणे या दृष्टिने भारतात लोकशाही टिकली असली तरी सरकारचे निर्णय व धोरणे लोकमतावर अवलंबून असावीत हा जो लोकशाहीचा मुख्य उद्देश आहे त्या कसोटीवर भारतातील लोकशाही ही लोकशाही नाही असे म्हणणे भाग आहे. स्वराज्याच्या चळवळीत स्वराज्याची काही उद्दिष्टे जनतेने मान्य केली होती व ती संविधानात ग्रंथित केलेली आहेत. 'संविधान लागू झाल्या पासून ते अमलात आणण्याचा प्रयत्न झाला की त्याचे धिण्डवडे उडविण्याचा प्रयत्न झाला ? असा प्रश्न विचारला असता गेली ५० वर्षे संविधानाचे धिंडवडे उडविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला असे दु:खाने म्हणावे लागते. याची उदाहरणे पुढीलप्रमाणे.

संविधानाच्या आज्ञापक कलमापैकी भाषाविषयक कलम महत्वाचे आहे. या कलमाने सरकारला असा आदेश दिला आहे की १५ वर्षाच्या आत केंद्र सरकारच्या कारभारातून इंग्रजी भाषेचे पूर्णपणे उच्चाटन करावे व सारा कारभार देवनागरी लिपीतील संस्कृतप्रधान हिंदीत करावा.

हे कलम पारित झाल्यापासूनच ते अमलात आणण्याऐवजी त्याला केराची टोपली कशी दाखविता येईल याचेच कारस्थान रचण्यात आले. हिंदीची व एकूणच देशी भाषांची टवाळी हा पं. नेहरूंच्या भाषणाचा एक मुख्य विषय असे. संविधान पारित झाल्याबरोबर' इंग्रजीचा दर्जा कमी होत आहे.' अशी ओरड करून इंग्रजीसाठी एक खास संस्था स्थापन करण्यात आली. 'हिंदीचा आग्रह धरणे हा हिंदी 'साम्राज्यवाद' आहे, दक्षिण भारतीयांवर जुलूम आहे व म्हणून दक्षिण भारतीयांच्या संमतीशिवाय हिंदीचा वापर करण्यात येणार नाही' असे नेहरूंनी आश्वासन दिले. असे

आश्वासन दक्षिण भारतीयांनी कधीच मागितले नव्हते हे लक्षात ठेवले पाहिजे. हिंदीचे कलम पारित झाले तेव्हा संविधान समितीत दक्षिण भारतीयांनी त्याला विरोध केला नव्हता. 'हे कलम अध्यक्षाच्या निर्णायक मताने पारित झाले, वस्तु:त त्याला दक्षिण भारतीयांचा विरोध होता' असा प्रचार नेहरूंच्या कारकीर्दीत जोराने झाला. तो साफ खोटा आहे. हिंदीचे कलम सर्वानुमते पारित झाले होते. दक्षिणेतील हिंदी विरोधी चळवळीचे जनक द्रमुकसारखे पक्ष नसून पं. नेहरू हे होते.

**देशी भाषा विरुद्ध जिहाद**

दक्षिण भारतीयांप्रमाणे नेहरूंनी मुसलमानांना हिंदी विरूद्ध चिथावण्या दिल्या. देवनागरी लिपीतील संस्कृतप्रधान हिंदी ही केंद्र सरकारची भाषा राहील असे संविधानात स्पष्ट म्हटले असताना नेहरूंनी संस्कृतप्रधान हिंदीची टवाळी करून सरल हिंदी वा हिंदुस्तानी म्हणजे साध्या शब्दात उर्दूचा पुरस्कार केला. नेहरूंना उर्दुचे फार प्रेम होते असे नव्हे. हैदराबाद विमोचनानंतर त्यांनी अगदी पहिला आदेश काढला तो उस्मानिया विद्यापीठातून उर्दुचे उच्चाटन करण्याचा. तेव्हा नेहरूंच्या उर्दू पुरस्काराचा उद्देश मुसमानांना हिंदीविरूद्ध भडकावणे एवढाच होता याबद्दल संशय नाही.

केंद्र सरकारमधून हिंदीची उचलबांगडी करूनच केवळ नेहरू थांबले नाहीत. त्यांचा कटाक्ष फक्त हिंदीविरूद्धच नसून साऱ्याच भारतीय भाषेविरूद्ध होता. विशेषत: संस्कृतचे उच्चाटन हे त्यांचे एक लक्ष्य होते. ब्रिटिश काळात मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्याला संस्कृत येतच असे. संस्कृतला पर्याय ड्राइंग वा फारशी अरबी या भाषा असत. पण फारच थोड्या शाळात फारसी/अरबी शिकविण्याची व्यवस्था असे व ड्राइंग हा विषय सगळ्यांना येण्यासारखा नाही. त्यामुळे संस्कृत हे मॅट्रिकला जवळ जवळ आवश्यक असून त्याचा दर्जाही बराच वरचा होता. चांगल्यापैकी विद्यार्थ्याला रामायण/महाभारत सहज कळेल व कालिदास देखील थोड्याशा प्रयत्नाने कळेल एवढा तो दर्जा होता. संस्कृत सुभाषिताचा प्रयोग करणे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जात होते. कथाकिर्तनातून संस्कृतचा वापर एवढ्या रसाळपणे होत असे की शाळेत संस्कृत सुरू होण्याच्या आधीच कथाकीर्तने ऐकणाऱ्यांना संस्कृतमध्ये गोडी थोडीशी व्युत्पत्ति प्राप्त होत असे.

नेहरूंनी हे सर्व बदलले. विज्ञान घेणाऱ्याला संस्कृत घेताच येणार नाही अशी व्यवस्था केली. संस्कृतचे गुण क्रमांक ठरविण्यात विचारात घेण्यात येऊ नयेत असा नियम केला. विद्यार्थी कमी आहेत या सबबीवर अनेक शाळातून संस्कृत अजीबात बंद करण्यात आले. संस्कृतच्या या दु:स्वासाबद्दल सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्यात आली तेव्हा सरकारी वकीलाने सांगितले की 'संस्कृत शिकविण्याची सरकारवर जबाबदारी नाही. सरकारवर संस्कृत शिकविण्याची जबाबदारी आहे असे मानले तर अरबी/ फारसी वा आफ्रिकेतील रानटी भाषा शिकविण्याची देखील जबाबदारी आहे असे का मानू नये?'

जो विचार नेहरूंनी कृतीने व्यक्त केला होता तो अधिकृतरीत्या सरकारी वकीलाने देशाच्या सर्वोच्च न्यायपीठासमोर शब्दांनी व्यक्त केला. एकूण संस्कृत ही नेहरूंच्या दृष्टीने अरबी/फारशीसारखीच एक परकीय भाषा आहे, नव्हे अरबी/ फारसीसारख्या परकीय भाषा इतके देखील तिला महत्व नाही, अरबी/फारशी या भाषा परकीय असल्या तरी शिकण्यासारख्या तरी आहेत, संस्कृत ही शिकण्यासारखी भाषाच नाही, ती एक आफ्रिकेतील रानटी भाषांसारखी भाषा आहे.

संस्कृत आज बोलली जात नाही व त्यामुळे शिक्षणाने तिच्यावर बहिष्कार घातला आहे. तिचे समूळ उच्चाटन करणे सुलभ आहे व हा आपला उद्देश नेहरूंनी सफल केला. पण आज बोलल्या जाणाऱ्या भारतीय भाषांची तशी स्थिति नाही. नेहरूंनी शिक्षणातून व राजकारभारातून त्यांचे उच्चाटन केले तरी लोकांच्या तोंडी त्या जिवंत राहणारच. नेहरूंना हेही नको होते. अशिक्षितांच्या झोपड्यांमध्ये भारतीय भाषा ऐकू येणे थांबविता येणार नाही, पण सुशिक्षितांचा कोणताही व्यवहार देशी भाषातून होऊ नये हा उद्देश साध्य करणे शक्य होते व तो साधण्यासाठी नेहरूंनी एक उपाय योजला. तो म्हणजे देशी भाषा फार कठिण आहेत, त्या सोप्या केल्या पाहिजेत म्हणून त्यांच्यात इंग्रजी शब्दांची भरपूर पेरणी करण्याचा.

**विभक्तीला प्रोत्साहन**

दहा शब्दांच्या वाक्यात आठ शब्द इंग्रजी वापरून देशी भाषा लिहिल्या की ज्यांना इंग्रजी येतं त्यांना फक्त

त्या समजतील व असे मराठी वा हिंदी वाचण्याची झालेल्यांना या भाषांचे उपलब्ध वाङ्मय वाचता येणार नाही. ते वाङ्मय ग्रंथालयांमध्ये धूळ खात राहील. मग काही दिवसांनी 'दहापैकी आठ शब्द इंग्रजी असणाऱ्या देशी भाषा वापरायच्या तर सरळ इंग्रजीच का वापरू नये? असा विचार सहजच उद्भवून सुशिक्षित सरळ इंग्रजीच वापरू लागतील व सुशिक्षितांच्या जगातून देशी भाषा पार हद्दपार होतील असा हा डाव होता.

याच उद्देशाने १९६२ साली नेहरूंनी 'आकाशवाणीला एक आदेश दिला व देशी भाषा फार क्लिष्ट आहेत, त्या सोप्या करण्यासाठी इंग्रजी उर्दू वगैरे शब्द मुक्तपणे वापरण्यात यावेत असे सांगण्यात आले. या आदेशाविरूद्ध आकाशवाणीच्या कर्मचाऱ्यांनी तक्रार केली. 'आम्ही वापरतो ती भाषा कठिण आहे अशी तक्रार आमच्याकडे आली नाही, हीच भाषा देशी वर्तमानपत्रे वापरतात, त्यांचे लाखो वाचक आहे, साऱ्या वाचकांना ही भाषा समजली नसती तर ही वर्तमानपत्रे केव्हाच बंद पडली असती' असे या कर्मचाऱ्यांनी निवदेन केल्यावर प्रसिद्ध मराठी लेखक मामा वरेरकर यांच्या सर्वानुमते असा निर्णय दिला की, 'आकाशवाणीवर सध्या वापरण्यात येणारी भाषाच योग्य आहे व तिच्यात फरक करण्याचे काही कारण नाही.'

पं. नेहरूंनी हा निर्णय केराच्या टोपलीत फेकला व आकाशवाणीवर इंग्रजीबद्दल देशी भाषा वापरण्याचा सपाटा चालविला. या भाषेचे अनुकरण मोठ्या प्रमाणांवर होऊ लागले. याप्रकारे ९०% इंग्रजी शब्द असलेल्या प्रतिनिधि या 'मराठी' कादंबरीला महाराष्ट्र सरकारने पारितोषिक देऊन गौरविले.

नेहरूंच्या धोरणामुळे ज्याना देशी भाषा वाचताच येत नाहीत असा सुशिक्षितांचा एक मोठा वर्ग निर्माण झाला आहे. स्वदेशाच्या बौद्धिक जीवनाशी पूर्णपणे पारखा झालेला हाच वर्ग देशाची धोरणे ठरवीत आहे. ही धोरणे राष्ट्रघातकी का ठरली आहेत याची कारणे शोधण्याची जरूर आहे काय?

भाषेच्या बाबतीत नेहरूंनी राष्ट्राच्या धोरणांशी पूर्णपणे विसंगत अशी धोरणे अमलात आणली तशीच ती सर्वच इतर बाबतीत आणली. सर्व नागरिकांना समान नागरी संहिता लागू करावी असा संविधानाचा आदेश आहे. पण नेहरूंनी सतत मुस्लिमांची भाषा वेगळी आहे, संस्कृति वेगळी आहे, ते परदेशातून आलेल्या मुघल/ तुर्कादिकांचे वंशज, आहेत असा प्रचार करून मुस्लिम स्वायत्ततेवर भर दिला व वेगळा हिंदू कायदा मंजूर करवून घेतला. 'मुस्लिमानां समान नागरी संहिता लागू करू नये' अशी मागणी मुस्लिमांनी केली नव्हती. नेहरूंनी बुद्ध्या वेगळेपणाची भावना मुस्लिमात पसरविली. आता तर काँग्रेसने 'समान नागरी संहिता लागू करायची नाही' असा संविधानविरोधी ठरावच पारित केला आहे.

संविधानाचा नेहरूंनी धाब्यावर बसविलेला तिसरा आदेश दारूबंदीचा आहे. ज्या राज्यसरकारांनी दारूबंदीचे कायदे केले त्यांची नेहरूंनी हेटाळणी केली.

‘सद्गुणसंवर्धक कायदे आस्ते करा’ असा त्यांनी एका भाषणात उघड आदेशच दिला. स्वराज्यानंतर दारुला भारतात पूर्वी कधी नव्हे एवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली. अमेरिका, रशिया वगैरे देशात दारूची हानिकारकता ओळखून तिच्या विरूद्ध कायदे व प्रचार यांनी जोर पकडला आहे. दारूचा प्रचार इतका झपाट्याने कमी होत आहे की दारूचे व्यापारी चिंतित झाले आहेत. तसे असता भारतात केवळ दारूचेच नव्हे तर सर्वच मादक पदार्थांचे सेवन वाढत आहे.

**विज्ञानक्षेत्रातली रडकथा**

चवथा संविधानाचा आदेश गोवधबन्दीबद्दल आहे. हा आदेश अमलात आणावा अशी विनंती करण्यासाठी शिष्टमंडळ घेऊन गेलेल्या एका साधूला नेहरूंनी थोबाडीत मारली व दुसऱ्या एकाला ढकलून दिले. दुसरा आपल्यावर बलप्रयोग करणार नाही या खात्रीने नेहरू सन्मान्य लोकांना थपडा मारून वा अन्यप्रकारे झोंबाझोंबी करून अपमानित करीत असत.

स्वभाषांचा वापर हा नेहरूंनी जसा टवाळीचा विषय केला त्याचप्रमाणे गोवधबंदी ही एक विज्ञानयुगाकडे पाठ फिरवून बसलेल्या अंधश्रद्धाळूंची मागणी आहे असे मत नेहरूंनी पसरविले. वस्तूत: गोरक्षणाच्या अर्थशास्त्रावर बरेच काम झाले आहे. वि.म. दांडेकरांसारखे काही लोक सोडले तर गोरक्षण आर्थिक दृष्ट्या फायदेशीर आहे असेच साधारणपणे तज्ज्ञांचे मत आहे. या मताचा पुरस्कार करणाऱ्यांपैकी डॉ. सुखात्मे हे एक प्रसिद्ध सांख्यिक होते.

संविधानाच्या मते आरक्षण फक्त अनुसूचित जातींबद्दल असावे व तेही दहा वर्षांनंतर रद्द करावे. या अनुसार मद्रास सरकारने एका तरूणाला तो ब्राह्मण आहे या सबबीवर नोकरी नाकारली तेव्हा मद्रास उच्च न्यायालयाने ते कृत्य अवैध ठरविले. त्यावेळी दुबळ्या वर्गांच्या हितासाठी जातींच्या आधारावर पक्षपात करणे अवैध मानू नये अशी दुरूस्ती नेहरूंनी संविधानात सुचविली. पुढे उसळलेल्या मंडल अनर्थाचे हे सूतोवाच होते.

याप्रकारे नेहरूंनी साऱ्याच संविधानाचे धिंडवडे उडविले. असे धिंडवडे उडविताना आपले संविधान चुकीचे आहे व त्याची अमुक प्रमाणे आहेत असा प्रचार नेहरूंनी कधीच केला नाही. आपल्याला संविधान मान्य आहे पण ते अमलात आणण्यास वेळ योग्य नाही असाच त्यांनी प्रचार केला. नेहरूंच्या कोणत्याही कृत्याबद्दल जनमत घेण्यात आले असते तर त्याच्या बाजूने चारदोन मते पडण्याचाही संभव नव्हता. नेहरू हे म. गांधींचे उत्तराधिकारी आहेत व त्यांचीच धोरणे पुढे चालवीत आहेत या समजुतीने जनता नेहरूंना मते देत होती. पण नेहरूंचा उद्देश गांधीवादाची कबर खणणे हा आहे हे जनतेच्या लक्षात आले नाही. तात्पर्य जनतेची मते घेऊन सारी जनताविरोधी धोरणे अमलात आणण्याचा अभूतपूर्व प्रयोग नेहरूंनी केला. लोकशाहीच्या वेषात १७ वर्षे भारतात एका माणसाची हुकूमशाही नांदत होती. तेव्हा भारतात गेली पन्नास वर्षे लोकशाही टिकली आहे ही एक अभिमानासप्द उपलब्धी आहे असे मानताना मन कचरल्याशिवाय राहत नाही.

हुकूमशाही देशाला सर्वस्वी अहितकारकच असते असे नाही. पण नेहरूंच्या हुकूमशाहीबद्दल असेही म्हणता येत नाही. नेहरूंनी मोठ्या युक्तीने देशीत भाषांचे उच्चाटन केले. यात काही ज्ञानविरोधी लोकांना दु:ख होत असले तरी या देशात विज्ञान रूजण्यासाठी व आधुनिक जगाच्या शर्यतीत मागे न पडण्यासाठी

इंग्रजी भाषेचा नेहरूंनी केलेला पुरस्कार आवश्यक होता असे समर्थन करण्यात येते. या समर्थनाचे उत्तर भारताच्या प्रगतीच्या आकड्यांनीच मिळत आहे. इन्फर्मेशन सायण्टिस्ट नावाचा वैज्ञानिकांचा वर्ग आहे. विज्ञानाच्या प्रगतीबद्दल वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढणे हा या वैज्ञानिकांच्या सं. शोधनानचा उद्देश असतो. या वैज्ञानिकांनी निरनिराळ्या देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचा आढावा घेऊन त्यांचा क्रमांक लावला आहे. वैज्ञानिक प्रगतीचे निकष, वैज्ञानिकांची देशातील संख्या, त्यांनी केलेल्या संशोधनाचा विस्तार व त्या संशोधनाची उपयुक्तता हे वापरले. हे नियम वापरल्यावर असे दिसून आले की वैज्ञानिकांच्या संख्येचा विचार केला तर भारताचा क्रम चौथा लागतो, वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनाचा विस्तार लक्षात घेतला तर तो क्रम अकरावा लागतो व त्या संशोधनाची उपयुक्तता विचारात घेतली तर तो क्रम सत्तरावा लागतो. संशोधनाच्या विस्तारापेक्षा त्याची गुणवत्ता महत्वाची आहे हे लक्षात घेता इंग्रजीची पोपटपंची करणाऱ्या भारताचा विज्ञानातील क्रमांक जवळजवळ शेवटचा ठरतो.

**गप्प बसायला काय घ्याल ?**

जे देश विज्ञानात भारताच्या वर आहेत त्या कुणातच भारताइतके इंग्रजीचे बंड नाही. चीनमध्ये राज्यकारभारच केवळ नव्हे तर मूळाक्षरापासून तो अणुभौतिकीपर्यंतचे सर्व शिक्षण चीनी भाषेतून होते. इंग्रजीची वैज्ञानिक परभाषा जागतिक आहे असा आग्लंदासांनी खोटा प्रचार केला पण चीन व जपानमध्ये परिभाषेसह सारे विज्ञान चीनी व जपानी भाषेत अवतीर्ण झाले आहे.

पाकिस्तान भारतापेक्षा मागासलेला आहे अशी पुष्कळ सुशिक्षितांची समजूत आहे. पण संयुक्त राष्ट्रांच्या आकड्याप्रमाणे पाकिस्तानचे दरडोई उत्पन्न भारतापेक्षा अधिक आहे. उत्पन्न सांगण्यासाठी आंतराष्ट्रीय व्यवहारात डॉलर हे विनिमय वापरले जाते. हे विनिमय वापरले तर बांगला देशाचे सरासरी उत्पन्न भारतापेक्षा कमी आहे पण आहे त्या उत्पन्न बांगला देशाचा रहिवासी काय विकत घेऊ शकतो व भारताचा रहिवासी काय घेऊ शकतो याचा विचार केला तर बांगलादेशाचे दरडोई उत्पन्न भारतापेक्षा अधिक आहे. तसेच बांगलादेशात बालमृत्यूंचे प्रमाण भारतापेक्षा कमी आहे.

दरडोई उत्पन्न सरासरी आयुर्मान व साक्षरतेचे प्रमाण या तीन्ही निकषांचा विचार केला तर भारतापेक्षा श्रीलंका कित्येक शतके पुढे आहे. तरी श्रीलंकेला शांतता माहित नाही. गेली कित्येक वर्षे तेथे यादवी सुरू आहे. अशा तऱ्हेने जगातील १५३ देशांचा विचार केला असताना भारताचा क्रमांक १३५ वा लागतो. भारताच्या खाली जे देश आहेत त्यातल्या पुष्कळांची लोकसंख्या नागपुर एवढी आहे व त्यांची नावेही फारशी कोणी ऐकलेली नसतात.

नेहरूंच्या पंचवार्षिक योजनांचा बराच डांगोरा पिटण्यात येतो. वस्तुत: भारताची दैना होण्यास याच योजना मुख्यत: कारणीभूत आहेत. मध्यंतरी तीन वर्षे योजनाविरहित वर्षे म्हणून पाळण्यात आली होती. या वर्षामध्ये भारताची प्रगति योजनासहित वर्षापेक्षा जास्त होती. म्हणून नेहरू योजनाबीजना न करता नुसतेच स्वस्थ बसतील तर भारताची प्रगति अधिक होईल असे उद्गार प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ शेनॉय यांनी काढले होते.

नेहरूंच्या योजनांनी देश भिकेस लागला याचे कारण असे आहे की या योजनांमध्ये आयव्यय विचार करण्यात आला नव्हता. जेवढे पैसे योजनांवर खर्च झाले त्यांच्यापेक्षा जास्त किमतीचे धन त्या योजनातून निर्माण झाले नाही तर योजना करणे व्यर्थ आहे हे साधे तत्त्व न ओळखता नेहरूंनी भाकरा नांगल सारखी धरणे व पोलादाचे कारखाने काढले. या पोलादांच्या कारखान्यातून निघालेले पोलाद सोन्यापेक्षाही महाग असते म्हणून ते कोणी घेत नाही व निरूपयोगी राशींच्या रूपाने ते पडून राहते. भाकरा नांगलमधून जेवढे

## स्वातंत्र्याची फळे !

**राजकारणातील उपक्रमशीलता, सचोटी, प्रामाणिकपणा, विपक्षीय नेत्यांबद्दल आदर या गोष्टी दुर्मिळ झाल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात टोकाचे मतभेद असणारी नेतेमंडळीही एकमेकांचा आदर करीत. आज राजकारणात बाजारबुणगे गुन्हेगार गुंड भरले आहेत. त्यांची सद्‌सद्‌विवेकबुद्धीच नष्ट झाली आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि पंजाब-राजस्थानपासून आसामपर्यंत देशभर फक्त अशांतता, अस्वस्थता दिसते आहे. बारीकसारीक कुरापती करून माणसे एकमेकांवर एके ४७ किंवा एके ५६ च्या गोळ्यांचा वर्षाव करीत आहेत. माणसाच्या प्राणाइतकी दुसरी स्वस्त वस्तू आज भारतात सापडणार नाही.**

उत्पादन होईल ते सर्व त्यावर झालेल्या खर्चाइतकेही असणार नाही असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. तेव्हा प्रत्यही भाववाढ घडवून आणण्याव्यतिरिक्त नेहरूंच्या योजनांनी काहीही साधले नाही.

शिक्षणाच्या क्षेत्रात नेहरूंनी ज्या अनुच्चारित योजना केल्या त्या लाजेने मान खाली घालायला लावतील अशा आहेत. भारत हा जगातील सगळ्यात निरक्षर देश आहे व या शतकाच्या अखेरीस जगातील निरक्षरांच्या ५५ टक्के निरक्षर भारतात राहणार आहेत.

लष्करी सामर्थ्य हा राष्ट्राच्या प्रगतीचा एक मानदंड आहे. १९४७ सली जेव्हा नेहरूंनी राष्ट्राची धुरा उचलली तेव्हा भारताचे सैन्य हे आशियात सर्वात बलिष्ठ सैन्य होते. पाकिस्तान जवळ अवघे आठ रणगाडे व शून्य विमाने होती. चीनमध्ये यादवी सुरू होती व जपान नि:शस्त्र झाला होता.

आज भारतीय सैन्य पाकिस्तानी सैन्याचा देखील पराभव करू शकत आही. ६५ च्या लढाईत पाकिस्तानने भारताचा खेमकरण हा प्रदेश व्यापला होता. तेथून त्याला हाकून लावण्यास भारतीय सेना असमर्थ ठरली होती.

**शोककथा**

वरील घटना गोळीबंदीच्या आधी झाली होती. गोळीबंदी जाहीर झाल्यावरही पाकिस्तानने राजस्थानात शिरून काही प्रदेश काबीज केला. तो सोडविण्यासाठी अहमदाबादहून सैन्य पाठविण्यात आले. त्या सैन्याचा राजस्थानमध्ये ठाण मांडून बसलेल्या पाकिस्तानी सैन्याने पराभव केला व त्याचा सेनापती आणि काही जवान बंदिस्त केले.

पाकिस्तानने काबीज केलेले हे भारताचे प्रदेश ताश्कंद येथे पाकव्याप्त काश्मीरचा मुक्त केलेला भाग पाकिस्तानला परत करण्याच्या अटीवरच परत मिळू शकले.

७१ च्या युद्धात पूर्व आघाडीवर पाकिस्तानी फौज शरण आली व विजय झाला, पण हा विजय रशियाच्या आशीर्वादाने झाला होता. रशियाने हा विजय झाल्याबरोबर युद्ध थांबवायला लावले.

याचवेळी पश्चिम आघाडीवर काश्मीरमध्ये भारतीय सैन्याचा पराभव होऊन पाकिस्तानने छांबचा प्रदेश हिसकावून घेतला. तो परत मागू नये म्हणून रशियाने भारतावर दडपण आणले, कारण रशियाशी दोस्ती केल्याने कसा फायदा होतो हे पाकिस्तानला दाखवून देण्यासाठी रशियाने इंदिरा गांधींचा हस्तक म्हणून वापर करून ६५ चे युद्ध घडवून आणले होते. बंगला देशमध्ये पाकिस्तानला थप्पड मारल्यावर रशियाने भारताच्या हितावरच तुळशीपत्र ठेवून पाकिस्तानने आपल्याशी भारतासारखाच तह करावा म्हणून पाकिस्तानची मनधरणी सुरू केली.

पाकिस्तान हे कितीही झाले तरी एक स्थापित सरकार आहे. त्याच्या सैन्याला भारतीय सैन्य हरवू शकले नाही तर समजू शकते. पण भारताकडून शस्त्रास्त्रे घेऊन श्रीलंकेत बंडाळी करणाऱ्या तमिळ वाघांचा बंदोबस्त करण्यासाठी राजीव गांधींनी जे सैन्य पाठविले होते त्याला तमिळ वाघांचाही बंदोबस्त करता आला नाही व श्रीलंका सरकारने त्या सैन्याला 'चालते व्हा' असे सांगितले.

एकूण राष्ट्राच्या प्रतिष्ठेचे सैनिक सामर्थ्य हे जे गमक, त्यात देखील भारताची दशा शोचनीय आहे. अशी ही पन्नास वर्षाच्या स्वराज्याची शोककथा आहे.

***